**महाराष्ट्र शासन**

राज्य सीईटी कक्ष, मुंबई
आवक क्रमांक ५२९९
दिनांक २८.०६.१९
शाखा
प्र.अ. आयुक्त

**क्र. सीईटी ३५१९/प्र.क्र.२०६/१९/शिक्षण-२**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
नवीन मंत्रालय, ९ वा मजला,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकूल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.
**दिनांक** : २६ जून, २०१९

**प्रति,**
१. आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय** : आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम प्रवेशप्रक्रिया – २०१९
उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत ...

**महोदय,**

आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रियेच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक १९ जून, २०१९ अन्वये माहिती पुस्तिकेस मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तथापि, उमेदवारांमार्फत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या विषयाच्या अनुषंगाने शासनाच्या निर्देशानुसार पुढील सूचना आपणास कळविण्यात येत आहेत :-

१. आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नोंदणी केलेल्या आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांपैकी ज्यांनी जात वैधता प्रमाणपत्र Upload केलेले नाही, अशा उमेदवारांच्या बाबतीत राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षामार्फत अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची यादी TIRT आणि आदिवासी विकास विभाग, तसंच इतर आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांची यादी BARTI आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास पाठविण्यात यावी. सदर संस्थांमार्फत संबंधित उमेदवारांचे जात प्रमाणपत्र पडताळणीचे अर्ज प्राधान्याने निकाली काढण्यात येतील.

२. आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेशोच्छुक उमेदवारांमार्फत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठीची मुदत ही प्रवेश नियामक प्राधिकरण निश्चित करेल अशा पहिल्या प्रवेश फेरीनुसार विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावयाच्या अंतिम दिनांकापर्यंत वाढविण्यात यावी.

**आपला,**

**(सुरेन्द्र प्र. चानकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव,**
१. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned with CamScanner